**प्रेसनोट** **दि.०४/०८/२०२६**

## पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ -०२, मुंबई.
## पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

**बेकायदेशीर अंमली पदार्थ जवळ बाळगून विक्री करणाऱ्या आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करून अटक केल्याबाबत.**

दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पायधुनी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकांनी गस्ती दरम्यान दिल्ली स्टॅन्ड, मस्जिद बंदर मुंबई आणि क्लाईव्ह क्रॉस रोड, रेल्वे पटरीचे बाजूला, मस्जिद बंदर पुर्व, मुंबई या दोन ठिकाणी छापेमारी करून गांजा या अंमली पदार्थाची विक्री करणारे ०२ महिला आणि ०१ पुरूष यांना ताब्यात घेवून अटक केलेली आहेत. अटक केलेल्या आरोपीचा तपशील पुढील प्रमाणे,

**१. नरेश जीवराज कंटारीया, वय- ३५ वर्षे,**
**२. बेबी बॉक्स शेख, वय- ५७ वर्षे,**
**३. हसनेन शेख, वय- २५ वर्षे,**

उपरोक्त नमुद आरोपींकडून एकुण ०९ किलो ४९४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ किंमत अंदाजे रू. ०३,६०,०००/- जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची उत्कृष्ट कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त श्री.मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर. (दक्षिण परिमंडळ ०२), सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती रेणूका बुवा (पायधुनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे, पोलीस निरीक्षक अजय कदम, तपासी अधिकारी सपोनि किरण मांढरे, पोउपनि कल्पेश चव्हाण, पो हवा ९८०६७३/खान, पो.ह.क्र.०८०००७/कदम, पो.ह.क्र. ०५०३४८/मुल्ला, पो.ह.क्र. ०८१२६९/ठाकूर, पो हवा ०८०२०४/शेंडे, पो हवा ०८०९३१/घोडे, पो शि ०९०४५३/वाकसे, पो.शि.क्र.०९२८९३/पाडवी, पो.शि.क्र.९३२३४/आलदर, पो.शि.क्र. ११०७००/पाटील, पो.शि.क्र.११०७१९/माळी, पो.शि.क्र. १४१०९२/शेख व पो.शि.क्र. १४०५८५/माळोदे, पो शि १३०२८८/इथापे, पो शि १४०१५३/पाटील, पो शि १४०५५१/सांगळे, पो शि १५०४७७/लोके यांनी केली आहे.